ज्ञानदीप लावू जगी

# पुणे नगर वाचन मंदिर

स्थापना : ७ फेब्रुवारी १८४८

email : pnvm1848@gmail.com
www.punenagarvachan.org

पुस्तकाचे नाव : मारुती चरित्र

लेखक : कृष्णाजी अबाजी गुरुजी

प्रकाशन वर्ष : १८९०

मूळ ग्रंथ प्रत : शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे

पुणे नगर वाचन मंदिर

अंकेक्षण (डिजीटायझेशन) प्रकल्प
अंकेक्षण रूपांतर - २०२४

# मारुती चरित्र



हें चरित्र,

**कृष्णाजी अबाजी गुरुजी**

यांनीं तयार करून

सातारा येथें

'बोधसुधाकर' छापखान्यांत छापविलें.

सर्व हक्क राखले आहेत.

नोव्हेंबर सन १८९०

किंमत १॥ आणा.

## अर्पण.

श्री. मारुती भक्त परायण शिवगिरीबोवा- संस्थान जरंडेश्वर यांस भक्ति पुरस्सर अर्पण केलें आहे.

---

## विक्रीचीं पुस्तकें.

भीष्मचरित्र ........................ १॥ आणा
गोरक्षण ........................ २॥ आणे

एकदम १०० प्रती घेणारास कमीशन मिळेल.

पुस्तकें सातारा " बोधसुधाकर " छापखान्यांत व पुण्यांत " श्री शिवाजी " छापखान्यांत मिळतील.

म१४३७८

# मारुतीची भक्ति कां करावी?

—**—

ईश्वर भक्त परायण गृहस्थ हो! आपण मारुती भक्त अहांत, आपल्या गांवांत मारुतीचें देवालय आहे, मारुतीचे पूजन व दर्शन आपण करीत असता, त्यास शेंदूर चर्चू न करीत असता, कोणी रुईच्या पानांच्या, कोणी उड दाच्या वड्यांच्या माळा घालून त्यास नवस करतात, कोणी शनवारीं उपोषण करतात व कोणी त्याची जयंती करून उत्साह ही करतात. परंतु असें करण्या पासून लोकांस जें फल मिळावें तें मिळत असल्याचें आढळत नाहीं. याचे भक्तीपासून सत्य, स्वामिभक्ति, दीर्घ उद्योग, शौर्य इत्यादि गुण उत्पन्न झाले पाहिजेत ते होत नाहींत. उलट प्रकार मात्र जास्त दृष्टीस पडत आहे, या मुळें लोकांचा विश्वास नाहींसा होत चालला आहे. पूज्यता अ गदींच लय पावली आणि पापाचरण, घातपात, इत्यादि दुष्कृती वाढत चालली; तेव्हां आपण भक्ति करण्यांत चुकत आहोंत अथवा हा देवच नाहीं असें मानलें पाहिजे. जर हा देव नाहीं असें ठरेल तर याची भक्ति कां करावी? असा प्रश्न होणें सहजी आहे. मी म्हणतों तो देवावतार आहे. आपले पुराण शास्त्रकारही तो रुद्रावतार आहे असेंच म्हणतात. तें योग्य आहे, सरळ आहे व सप्रमाणही आहे. आपणास अनुभव येत नाहीं, याचें कारण हेंच कीं, त्याचें चरित्र लो

क विसरलें. पूजा करतांना, भजन करतांना अथवा प्रार्थना करतांना मारुतीचा पराक्रम, परोपकारबुद्धी, दुष्टांचे हनना र्थ प्रयत्न आणि सुष्टास सहाय्य करण्यांत त्याची तत्पर ता कितपत होती हें मनांत आणण्याचें भान राहिनासें झा लें–नाहीं नाहीं–समजेनासें झालें. यामुळें दुष्परिणाम घ डत आहेत. हा प्रकार नाहींसा होऊन अज्ञान लोकांस मार्ग कळावा आणि त्यांनीं त्याचें चरित्र ऐकण्या पासून फायदा करून घ्यावा म्हणून हें लहानसें चरित्र सांगण्या स सुरुवात करतों. तें आपण लक्ष देऊन ऐकाल, त्याचें मनन कराल, एकाग्र चित्तानें मारुतीची मूर्ति मनांत आ णाल, आणि त्याचे अंगचे सर्व गुण आणि पराक्रम अंतः करणावर बठवून त्या प्रमाणें क्रिया कराल अशी मी आशा करतों.

याला मारुती ह्मणतात, हनुमान ह्मणतात, बळभीम ह्म णतात व कोणी हनुमंतही ह्मणतात. हीं अशीं नांवें कां व केव्हां पडलीं हें चरित्र ऐकतांना आपल्या लक्षांत ये ईलच. याचा पिता केसरी आणि माता अंजना हीं होत. केसरी हा गोकर्ण पर्वतावर रहात असे. हा मोठा शूर अ से, पराक्रमी असे व ऋषि सेवेस सादर असे. शंबसादन नांवाचा एक राक्षस मोठा बलाढ्य होता परंतु महाजन पीडक होता. त्याच्या पासून अनेक ऋषीस पीडा झाली.

त्यांचीं सत्कर्मे निर्वेधपणानें चालेनाशीं झाली. यामुळें त्यांनीं केसरीस सांगितलें कीं, हा दुष्ट, परपीडक राक्षस आहे याचा संव्हार करून सर्वांस सुखी करावें. केसरीनें ऋषीआज्ञा वंद्य मानून राक्षस संव्हारार्थ गेला. राक्षसा नें आणि याचें तुंबळ युद्ध होऊन राक्षस मारला गेला. तेव्हां ऋषींस संतोष झाला. आणि त्यांनीं केसरीस आशि र्वाद दिला कीं, "तुला सुस्वभावी, भगवद्भक्त आणि बला ढ्य असा एक पुत्र होईल" तेच हे आपले विषय नायक श्रीमारुती होत. माता अंजना ही कुंजर वानराची कन्या. ही पुंजिकस्थली नांवाची अप्सरा होती व शापा मुळें वा नरी झाली होती. ही तपस्विनी असून महापतिव्रता होती, तशीच शूर आणि तेजस्विनी होती. ही एकवेळ पर्वत शिखरावर बसली असतां वाऱ्याचे योगानें अंगावरील वस्त्र किंचित उडालें या मुळें तिची कांती उघडी पडली. तें वायूनें पहातांच मोह पावून तीस आलिंगन देण्याचे इच्छे नें जवळ आला. तेव्हां ही सती जरा बाजूस होऊन पा तिव्रत्य तेजानें त्याकडे पाहून ह्मणाली. वायो, "माझ्या पा तिव्रत्याचा भंग करण्याची इच्छा करूं नको. तुह्मा सार खे जगहितकरी व पराक्रमी असल्या अमंगल व असत् कार्यीं नाश पावलें तर ब्रह्माचा कोप होऊन जग ना श पावेल. तर अनुचित मार्गीं प्रवृत्त होऊं नको." हें सु

बोध आणि तिरस्कार युक्त भाषण ऐकून वायू शांत झा ला आणि प्रसन्न मुद्रेनें म्हणाला. "हे पतिव्रते, शुभकार णी अंजनें, तूं भिऊं नको. तुझें पातिव्रत्य भंग करून म हत्पापाचें साधन मिळवावें असें आचरण मी करणार नाहीं. तुझें तेज, औदार्य व जगत् कल्याणेच्छा पाहून मी सं तोषित झालों आणि तुला वर देतों कीं, तुला मत्तुल्य पर म पराक्रमी पुत्र होईल." इतका वर देऊन मरुत (वायू) गुप्त झाला. याचे प्रसादा पासून पुत्र झाला म्हणून त्या स मारुती असें नांव ठेवलें. दशरथाचे पुत्रकामेष्टींतील हविर्भाग घारीनें अंजनीचे हातीं टाकला. ही कथा प्रत्येक हनुमान जयंतीस आपण ऐकत आहांच. ज्यांचीं माता पितरें, भगवत्भक्त, पराक्रमी, सदाचरणी आणि तेजःपुंज असतात त्यांचीं मुलें त्यांचे सवाई निपजलींच पाहिजेत. केसरी, हा आपण हल्लीं आहोंत असा पराक्रमहीन अस ता आणि अंजनी आपल्या स्त्रियां प्रमाणें निर्बुद्ध, अज्ञान आणि अविचारी असती तर तीस अशा महात्म्यांचे प्रसाद मिळतेना आणि ती खाण्यास काळ आणि धरणीस भार असे च पुत्र प्रसवल्या शिवाय राहतीना. असो.

मारुतीचा जन्मकाल आणि सूर्याचा उदय काल एका च वेळेस असल्यामुळें सूर्यबिंब हा खाद्य पदार्थ आहे असें समजून त्यानें तो ग्रहण करण्यासाठीं उडी मारली. ती

इतकी उंच मारली कीं, देवांस भय पडलें. इंद्रास धाक पडला, आणि सर्व पृथ्वी अंधःकारमय होईल असें वाटूं लागलें; तेव्हां त्यानें मारुतीस वज्र मारलें तें त्याच्या हनुवटीस लागून तो मूर्च्छित पडला. आपण वर दिलेल्या पुत्राची अशी स्थिति पाहून वायूस राग आला आणि त्यानें आपली गति आवरली! तेव्हां अर्थातच पहिलें घरें ह्मणण्याचा प्रसंग आला! इंद्रादि देवांनीं वायूची प्रार्थना करून त्यास शांत केलें. मारुतीस सावध केलें आणि वज्रापासून इतःपर पीडा होणार नाहीं, असा आशीर्वाद दिला. या मुळें मारुती वज्र देही झाला. नंतर वायूनें मारुतीस आणून अंजनीचे स्वाधीन केलें आणि इंद्राच्या वज्रानें हनुवटी तुटल्यामुळें त्याचें नांव हनुमान असें ठेविलें.

मारुती लहान असतां विशेष गोष्टी केल्याचें अथवा घडल्याचें ग्रंथांतरीं वाचनांत आलें नाहीं, किंवा कोणी हरिदासानें सांगितल्याचें स्मरणांत नाहीं. तथापि मातुश्री पासून भगवत्भक्तीचें बरेंच ज्ञान त्यास प्राप्त झालें होतें; व तीर्थरूपाचे संगती अनेक वनें, उपवनें, गिरिकंदरीं फिरली असल्यामुळें धैर्य आणि बळ चांगलें वाढलें होतें. हा जात्या बुद्धिमान, त्यांत मातापितरांचें शिक्षण चांगलें, त्यांत मामादिक असल्यामुळें सुग्रिवाचें आणि यांचें चांगलें सख्य जुळलें होतें. सुग्रीव सैन्यांत मारुतीचा प्रवेश लहान

पर्णांच झाला होता व त्यासही हा विशेष अक्कल आणि धैर्याचा असल्यामुळें तो याम फारच वहाल होता. तथापि सुग्रिवाची समीपता आणि सचीव पदाधिकाऱ्यांत गणना, तो चांगला मोठा झाल्यावर झाली असें म्हणण्यास रामाय णांत बराच आधार सांपडतो.

रावणानें सीता चोरिली व रामलक्ष्मण सीतेचा शोध क रीत पंपा सरोवरावर आले तेव्हां मारुती ऋष्यमूक पर्वता वर होता. सुग्रीवहि तेथेंच होता. पंपा सरोवरावर आलेल्या रामलक्ष्मणास पाहून सुग्रीव साशंक झाला. हे कोण? कोठून आले? आणि कां आले? याची कल्पना त्यास होईना. वि चारपूस न करतां त्यांस राहूं देणें अथवा जाऊं देणें हो सु ग्रिवास बरें वाटेना तेव्हां त्यानें मारुतीस बोलावून सांगि तलें कीं, पंपा सरोवरावर हे कोण आले आहेत, व येथें ये ण्याचें कारण काय? त्यांचा मानस येथें रहाण्याचा आहे अथवा येथून पुढें कोठें जाण्याचा आहे? वगैरे सर्व तपास करून ये आणि येतांना त्यांची शक्ति आणि पराक्रम या चा अदमास काढून ये. सुग्रिवाची आज्ञा घेऊन मारुती रामलक्ष्मणाकडे येण्यास निघाला.

मारुती फार चाणाक्ष असल्यामुळें त्यानें प्रथम रुपांतर केलें आणि साध्या पण रसाळ वाणीनें स्तुतिपर भाषणास सुरवात केली. मारुती म्हणाला—महाराज, आपण कोण व

कोठून आला हें ऐकण्याची आह्मास फार इच्छा आहे. आपल्या मुद्रेवरून आणि राजचिन्हा वरून आपण कोणी तरी राजकुलोत्पन्न थोर पुरुष आहांत असें वाटतें. आपल्या जवळील भव्य आणि सतेज शस्त्रास्त्रावरून आपण मोठे पराक्रमी आहांत असें दिसत आहे. आपण अलंकार भूषणांचा त्याग करून, वल्कलें धारण केलीं आहेत, जटा वाढवून तापसवेष धारण केला आहे तथापि विशेष कारणामुळें हा प्रकार आपण केला असावा असें आपल्या गंभीर, शांत आणि उदार चर्ये वरून दिसतें. तर महाराज, आपण कोण? व येथें कां आलांत हें कृपा करून सांगा. मी इतकें बोलत आहे आणि विचारीत आहे तरी आपण उत्तर देत नाहीं हें काय? असें कां आपलें मनांत आहे कीं, मी आपणाकडे आलों, आपलें वृत्त मात्र विचारीत आहे आणि मी आपलें कांहींच सांगत नाहीं; हें शिष्टाचार विरुद्ध आहे, तेव्हां त्यास उत्तर देणें अयोग्य आहे? असेंच असेल तर मी अगोदर आपली हकीकत सांगतो कृपाकरून श्रवण करा. हा जो ऋष्यमूक पर्वत आहे त्यावर वानरांचा राजा सुग्रीव रहात असतो. त्याचा भाऊ वाली त्यानें याची प्रिय पत्नी नेऊन याजसी सहा महिन्यांनीं युद्ध करीत असतो. या भयानें हा येथें बसला आहे. आपणास धनुर्धारी पहातांच त्याचें मन सा

शंक झालें आहे. त्यास वाटतें वालीनें आपणास याचा वध करण्यास पाठविलें असावें. परंतु आपल्या स्थिति वरून तसा प्रकार तर दिसत नाहीं हें संतोषानें आपणास सां गतों. मी त्याचा सचीव आहे. माझें नांव मारुती. आपण वालीस सहाय्य न करतां सत्पक्षास सहाय्य कराल असा मला भरंवसा आहे.

मारुतीचें हें भाषण ऐकून रामास आश्चर्य वाटलें व आनंदही झाला. रामचंद्र लक्ष्मणास ह्मणाले. वत्सा लक्ष्मणा, ह्या कौपीन धारी बटूचें भाषण ऐकलेसना? हा वानर असो न भाषा किती शुद्ध बोलत आहे! मला वाटतें हा चांग ला व्याकरणी आहे. याचें भाषा माधुर्य, आणि गंभीर विचार पाहून मलातर असें वाटतें कीं, याची माता आणि पिता चांगली असोन याचा गुरुही पण योग्यच असला पाहिजे. असे सचीव ज्यापासी आहेत तो धन्य समजला पाहिजे. मारुती हें भाषण ऐकत असतां चकित होऊन त्यास मातेच्या वाक्याची आठवण झाली. जो तुझा गुरू कौपीन ओळखील त्याचा तू दास हो, मातेनें असें सांगितलें आ हे; आणि यांनीं तर ती ओळखिली; तेव्हां हेंच आपलें दै वत तर नसेल? अशा विचारांत मारुती आहे तों लक्ष्मणा नें सुग्रिवाशीं सख्य करावें असें रामचंद्राचे मनांत आहे असें जाणून लक्ष्मणानें आपली सर्व हकीकत पंपा सरोवरास येई पर्यंत

सांगितली. ती ऐकून मारुती आनंदानें ह्मणाला तु
ह्मी दोघेही समदुःखी आहांत, तेव्हां एकमेकांस सहाय्य
करण्यांत अंतर करणार नाहीं असें मला वाटतें. कारण सम
दुःखी एक होऊन जें कार्य करतात तें चांगल्याच्यानें कधीं
ही होणार नाहीं. तर श्री रामचंद्रा, तूं वचन देत असशी
ल तर मी तुझें आणि सुग्रिवाचें सख्य करून देतों. तो शू
र आहे, दृढ निश्चयी आहे, व दीर्घ उद्योगी आहे. तुझी
जानकी गिरिकंदरीं असली, समुद्रांत असली, अथवा पा
ताळांत असली तरी तीस शोधून काढण्याचें सामर्थ्य त्याच्यांत
आहे, यांत संशय नाहीं. भावाचे संबंधांत हताश झाला आहे,
तो भ्याड पणानें झाला नसोन त्या इंद्रदत्त मालेमुळें झा
ला आहे. मारुतीचें हें भाषण ऐकून रामचंद्रानें सानंद मु
द्रेनें वचन दिलें. तेव्हां मारुतीनें आपलें पूर्व रूप धारण केलें
व ते तिघेही ऋष्यमूक पर्वतावर आले. नंतर सु
ग्रिवाचे आणि रामाचें सख्य करून देऊन वालीचें निर्दळ
न करविलें. पति दुःखामुळें वालीची स्त्री तारा अति विव्हल झाली
होतीच व त्यांत सुग्रिवास राज्य मिळाल्यामुळें अंगद उघडा प
डला आणि कदाचित् सुग्रीव अंगदाचा नाश करील असें तारेस
वाटल्या मुळें तिचा शोकसमुद्र उचंबळून चालला,
तेव्हां मारुतीनें तारेस उत्तम उपदेश केला व रामचंद्राकडून
तिची सुव्यवस्था करविली. अंगद लहान होता तरी वाली

चे इच्छे प्रमाणें यास युवराजा केलें. मारुतीचें पहिलें कृत्य तें हेंच होय.

पुढें पर्जन्य कालास प्रारंभ झाल्यामुळें सुग्रिवानें राज्योपभोगाशिवाय कांहींच केलें नाहीं. रामानें सुग्रीव सैन्याची चालना केली व मारुती रामसेवेंत मग्न झाला. चातुर्मास्य संपल्या नंतर सिता शुद्धी करितां वानर सर्वत्र पाठविलें. त्यात अंगद, मारुती आणि दहा वानर दक्षिणेकडे निघाले. मारुती हा चतुर, बुद्धिवान, धोरणी आणि शूर आहे, सितेचा शोध लावला तर हाच लावील अशी रामचंद्राची खात्री झाली असल्यामुळें ह्यानें आपले हातांतील आंगठी मारुतीपाशीं दिली आणि सांगितलें बा मारुते, तुझें कर्तृत्वा वरून आणि उमेदी वरून सितेचा शोध तूच लावशील अन्यास शोध लागणें कठीण आहे. या साठीं ही माझी आंगठी तुजजवळ असूंदे. सितेचा शोध लागला ह्मणजे तू माझा सखा आहेस अशी तीची खात्री पटविण्याचा प्रसंग असल्यास ही दाखिव ह्मणजे तिची खात्री होऊन ती आपली सर्व हकीकत तुला सांगेल. मारुतीनें आंगटी हातांत घेऊन रामचरणीं मस्तक ठेवलें आणि आपल्या कपी गणासह दक्षिण पंथाचा मार्ग धरला.

जातां जातां वाटेंत कंडुक ऋषीचें अरण्य लागलें. त्यांत एक राक्षस बराच बलाढ्य होता. त्यानें या वानर सेनेस कांहीं वेळ त्रास दिला. मारुतीनें प्रथम सौम्य उपायानें

त्याचें परिमार्जन केलें तथापि तो ऐकेना, पुन्हा त्रास देऊं लागला. तेव्हां जास्त कडक उपाय योजला तरी तो शांत होईना, विशेषच त्रास देऊं लागला. अखेरीस रामकार्यार्थ निघालेल्या वानर सेनेचे प्राण हरण करणारा दुष्ट राक्षस मरणासच पात्र आहे असें समजून मारुतीनें उपेक्षा न करितां त्यास आपल्या पराक्रमाच्या झपाट्यांत आणून हें अरण्यच यमपूर केलें!

पुढें बरेच लांब गेल्यावर हेमा अप्सरेची सखी स्वयंप्रभा इची आणि यांची गांठ पडली. स्वयंप्रभेनें यांचें आगत स्वागत फारच उत्तम तऱ्हेनें केलें. इतकेंच नाहीं पण समुद्र तीरा पर्यंतचा पल्ला पोंहचविण्यास मदत केली. या वेळेस इची मदत मिळाली नसती तर यांस फार त्रास होऊन वेळही बराच लागला असता. कारण हें गुन्हा स्थळ मयासुरानें हेमे करतां मुद्दाम तयार केलें होतें आणि तिनें तें इला दिलें होतें. यांतून मार्ग सांपडून जाणें चांगलेंच कठीण झालें होतें. असो! तेथून हे विंध्य पर्वतावर गेले. तेव्हां अंगदास वाटलें आपण इतके दूर आलों, श्रम केले, आणि वेळ दवडला तरी सितेचा पत्ता लागत नाहीं तेव्हां आतां सीता शुद्धीची आशा व्यर्थ आहे. तेव्हां तो सर्वांस ह्मणाला. आपण सुग्रिवाच्या आज्ञेनें निघालों त्यास एक महिना झाला, अद्याप सितेचा थांग

लागत नाहीं! आतां असेंच माघारें जावें तर प्राणांत शिक्षा भोगावी लागेल! तेव्हां अन्नपानादि वर्ज करून ब्रह्मस्मरणांत येथेंच देह अर्पण करावा हें मला बरें वाटतें! तार नांवचा वानर होता तो ह्मणाला असें करण्या पेक्षां स्वयंप्रभेच्या गुहेंत बसावें हें चांगलें. हीं भाषणें ऐकून मारुतीनें स्मित हास्य केलें आणि ह्मणाला. इतक्यांतच धैर्य हीन कां होता? हा समुद्र दुस्तर आहे असें मला वाटत नाहीं. आपण सर्व जर उद्योग करूं तर हा पार तरून जाऊन खचित सीता शुद्धि करूं. असे हातपाय गाळणें हें पौरुषास उचित नाहीं! प्रयत्न करणें हें आपलें कर्तव्य आहे. सीता पृथ्वी फोडून गेली नाहीं. ज्या ठिकाणीं असेल तें ठिकाण आपल्या शक्तिबाह्य असण्याचा संभव नाहीं. तेव्हां इतक्यांतच हताश होऊं नका! धैर्य धरा, बल खर्च करा, युक्ति योजा आणि कोणी कडून तरी सीता शुद्धि होईल असा विचार काढा.

यांचीं अशीं भाषणें चाललीं आहेत तों संपातीनें यांस पाहिलें. संपाती हा सामान्य नव्हता. मारुती प्रमाणें यानें ही सूर्य मंडला पर्यंत भरारी मारली होती. शिवाय तो चंद्रमा मुनीच्या सहवासानें अध्यात्म विद्येंत प्रवीण झाला होता. संपातीनें ही वानर मंडळी पहातांच हा भक्ष्य चांगला आहे आणि पुरेसाही आहे असें मनांत आणून किरण

साधीत साधीत त्यांजकडे चालला. संपातीस पाहून अंगद
चें धाबें दणाणलें! हे पक्षीराज आपणास गिळणार. असें
वाटून त्यास फार वाईट वाटलें! तो सर्वांस ह्मणाला. आपण
ज्या कार्यास निघालों तें कार्य न होतां आपण याच्या भ
क्ष्यस्थानीं जाणार हें निःसंशय आहे. जटायूनें रामकार्यार्थ
जसे आपले प्राण खर्ची घातले तसा योग आपणास येता तरी
चांगलें झालें असतें! तसा योगायोग येण्याचें हें चिन्ह
नाहीं, त्यास उपाय काय? अंगदाचें हें निर्वाणीचें भाषण सं
पातीचे कानीं आलें व त्यांत त्याच्या कनिष्ट भ्रात्याचें
नांवही ऐकण्यास सांपडलें. तेव्हां त्याचे इच्छेची पहिली दि
शा पालटली. त्यानें अंगदास विचारलें माझ्या प्रिय बं-
धूचें स्मरण करणारे तुह्मी कोण? व येथें काय कार्यार्थ आ-
लात? संपातीचें हें शांतपणाचें भाषण ऐकून अंगदास बराच धी
र आला. त्यानें सांगितलें हे पक्षिराजा, सीता शुद्धी साठीं सुग्री
वानें आह्मास पाठविलें आहे परंतु तिचा थांग अद्याप लागत
नाहीं. आह्मी तर मरणास तयार झालों आहोंत परंतु जटायु प्र
माणें आह्मास मरण येतें तर चांगलें झालें असतें, असें वाट
ल्या मुळें आह्मी जटायूचें स्मरण केलें. आपण जटायूचे बंधू
आहांत आणि त्यांचें नांव घेतांच सप्रेम अंतःकरणानें अव-
लोकन करूं लागलांत यावरून आपण फार थोर आ
हांत यांत संशय नाहीं. आतां आपल्या वृत्तानें आमचें मन शां

स कराल तर फार उपकार होईल. हें आपण ऐकून संपाती नें आपलें सकल वृत्त सांगितलें व सीता लंकेंत आहे. तुह्मी समुद्र तरून गेल्यास तिचा शोध लागेल असेंही सांगितलें.

सीता लंकेंत आहे इतका तपास लागला, यामुळें सर्वांस आनंद झाला उमेद आली, आणि सीताशुद्धी करून आपण खचित विजयी होऊं असेंही सर्वांस वाटलें. मग अंगदानें कोणांत किती बळ आहे ह्मणून प्रश्न करतांच, गज, गवाक्ष, शरभ, इत्यादि वानर मंडळी पुढें आली आणि कोणी दहा योजनें उडी मारीन, कोणी वीस कोणी तीस योजनें उड्डाण करूं असें ह्मणूं लागले. शेवटीं जांबवानावर प्रश्न आला तेव्हां तो म्हणाला, मी आतां वृद्ध झालों आहे आतां माझ्यानें फार उड्डाण करवणार नाहीं तरी आतां नव्वद योजनाचे वर कांहीं जास्त उडी मारवेल असें मला वाटतें. अंगद ह्मणाला मी शंभर योजनें उडेन पण परत येववेलच असें निश्चयात्मक सांगवत नाहीं. शेवटीं जांबवान ह्मणाला तू सर्वांचा नियामक आहेस तेव्हां तूं जाऊं नये. तेथें जाण्यास आणि कार्य करण्यास योग्य कायते ते गृहस्थ, ते पहा! दूर कसे मौन धरून मौज पहात बसले आहेत. त्यांची विनवणी केल्या शिवाय हें भागावयाचें नाहीं तर चला आपण तिकडेच जाऊं. असें म्हणून अंगद आणि जांबवंत मारुतीकडे गेले, आणि जांबवंत मारुतीस म्हणाला. हे महाबळे हनुमंता, आपण येथपर्यंत मज

ऊ मारली आणि आपल्या सुदैवानें, कां? रामप्रसादानें सीते चा थांगही लागला, पण पुढील कार्य करणें तें तुजवांचून होणार नाहीं; तर हे वायुसुता बलवंता आतां पुढील कार्य करून सर्वांचें प्राणरक्षण तुजवांचून कोण करील? तूं धीर आहेस, पराक्रमी आहेस आणि चतुरही आहेस, तर तूं सीतेची शुद्धी करून लौकर परत ये.

जांबवंताचें भाषण सुरू असतांच मारुतीस स्फुरण चढ लें. अटीवजेटी प्रमाणें बाहू स्फुरण पावूं लागले, स्वरूप उग्र दिसूं लागलें, त्याचे कांतीवर पराक्रमाची छाया इत की पडली कीं, हा एका क्षणांत ब्रह्मांड खळवळून सोडी ल कीं, काय असें वाटेल! जांबवंताचे भाषणास तथास्तु म्ह णून मारुतीनें उत्तर दिलें आणि उभा राहिला, व हृदयस्थ असोन सर्व व्यापी जो परमात्मा त्याच्या चराचर विभूती स नमस्कार करून जें उड्डाण केलें तें मैनाक पर्वता पर्यंत तो पर्वताची इच्छा मारुतीनें कांहीं फल आहार करून वि श्रांती घ्यावी अशी होती व सागरानें तसें त्यास सांगित लेंही होतें परंतु ज्या रामकार्यार्थ आपण निघालों आहोंत तें केल्या शिवाय खाणें इष्ट नाहीं म्हणून मारुतीनें पर्वता चे उपकार मानून पुढें गमन केलें. मारुती बलवान व चतुर आहे अशी कीर्ति देवांत पसरली, त्याचें सत्यमिथ्यत्व पहा ण्या करितां सुरसा नामक स्त्री पाठविली. तिनें मार्गांतच

मारुतीस अडविलें आणि म्हणाली कीं, माझे मुखांत प्रवेश कर. मारुती म्हणाला तू ह्मणतेस तसें केलें असतें परंतु मी सीता शुध्यर्थ निघालों आहे तर तीस भेटून तिचा निरोप रामास कळविल्या वांचून मला थांबतां येत नाहीं. सुरसेनें त्याचें न ऐकतां जबडा पसरला, मारुतीनें तिचे पेक्षांही मोठा केला, तिनें आणखी मोठा केला, यानेंही तिजपेक्षां मोठा केला, तिनें आणखी वाढविला तेंव्हां असें करण्यांत वेळ दवडणें चांगलें नाहीं ह्मणून मारुतीनें लहान रूप घेऊन चटकन् तिचे मुखांतून बाहेर निघून तिला नमस्कार केला. आणि आतां जातो आज्ञा दे असें ह्मणाला. हें पाहून ती संतोष पावली आणि ज्या अर्थी तू बलवान चतुर व स्वामी कार्य दक्ष आहेस; त्या अर्थीं तुझा जय असो. येथून मारुती पुढें चालला असतां, त्याची भव्य आणि विस्तीर्ण छाया समुद्रावर पडली. ती कश्यपाची कन्या, हिरण्यकश्यपूची भगिनी व विप्रचिति दानवाची स्त्री इनें आकर्षून घेतली. त्यामुळें मारुती समुद्रांत पडला तेंव्हां त्यानें तिचा वध करून लंका गाठली.

मारुती लंकेजवळ आला तों संध्याकाळ झाला होता. थोड्याच वेळानें चांगलें चांदणें पडलें तेंव्हां आंत शिरूं लागला. तों लंका देवीनें अडविलें. त्यानें प्रथम शांत पणानेंच आंत जाण्याचा प्रयत्न केला पण निष्फळ झाला. ते

व्हां त्यानें तिचा पराभव करून आंत प्रवेश केला. लंके ची अवर्णनीय शोभा पाहून मारुतीस आश्चर्य वाटलें. अने क राजमार्ग पाहिले, मोठ्या भव्य सुशोभित आणि सुंदर इमारती एक सारख्या असलेल्या पाहिल्या, अति विस्तीर्ण आणि अति उंच अशीं गोपुरें पाहिलीं, मोठ मोठ्या बागा, राया, वनें, उपवनें, क्रीडास्थानें पाहिलीं, कोशागेरें पाहिलीं, यानगृहें, शस्त्रास्त्रगृहें, पाहिलीं. तसेंच गज, वाजी, रथ, पदाति इत्यादिकांची स्थलें पाहिलीं. रावणाचा अति विस्तीर्ण, सुशोभित, आणि समृद्ध वाडा पाहिला, आणि कदाचित जानकी येथें असेल ह्मणून आंत प्रवेश केला. आंतील मनोहर आणि सुव्यवस्थित रचना पाहून मारुतीस संतोष आणि क्रोध हे उत्पन्न झाले. असें पहात पहात शेज गृहांत गेला, तों तेथें रावण आणि मंदोदरी निद्रिस्त अस लेली पाहिली. तेव्हां त्यास वाटलें कीं, सीता संपातीनें सांगितल्या प्रमाणें अशोक वनांतच असेल तर तिकडे जाऊ न प्रथम शोध करावा हें चांगलें. असें मनांत येतांच मारु ती अशोक वनांत निघून गेला.

रावणा सारखा वेदाचे भाग करणारा, देवा सारख्या पासून सेवा घेणारा, नवगृहाच्या पायऱ्या करणारा, शंकरा सारख्यास प्रसन्न करणारा, चौदा चौकड्यांचें राज्य, मंदोदरी सारखी सुरूप आणि महा पतिव्रता स्त्री असतां परस्त्रीचे

नादानें सर्वांस अनरावा हें केवढें आश्चर्य! " दैव देतें आणि कर्म नेतें " तें हेंच आणि असेंच. असो, मारुती अशोक वनांत जाऊन पहातों तों तेथेंही त्यास अनेक मंदिरें अनेक वापी, व फलपुष्पाच्छादित लक्षावधी वृक्ष गगन चुंबित गेलेले दिसले. जिकडे पाही तिकडे रमणीय शोभा दिसे. अगोदर लंका पाहूनच मारुतीस विस्मय झाला होता, त्यांत ही वनश्री पाहून त्याच्या विस्मयांत जास्तच भर पडली. असो, अशी वन शोभा पहात पहात मारुती चालला आहे तों एका सिसवंचिया वृक्षाखालीं अनेक राक्षसिनीं भोंवती असोन, मध्यें पीतवस्त्र परिधान केलेली मुक्त केशा, रामानें जिचा ध्यास घेतला आहे व आपण जिला शोधीत आहों ती कृशांगी, दुःखित व ध्यानस्थ अशी दिव्य स्त्री पाहिली. तिचें अप्रातिम तेज पण दुःखित मुद्रा पहातांच सीता हीच असली पाहिजे अशी मारुतीची खात्री झाली. अशा गुणवती, रूपवती, आणि पतिव्रता स्त्री बद्दल रामास शोक होणें अगदीं यथार्थ आहे असेंही त्यास वाटलें. कां वाटणार नाहीं? ही लावण्य खाणी नसती, रासवट स्त्रिया प्रमाणें असती तर रावणानें इतका उपद्व्याप करून स्त्रीहरणाचें जबरदस्त पातक सहन कां केलें असतें? असो, अशा विचारांत वायूपुत्र आहे तों प्रभात समयाचा संधी अला.

कामी जनांचें आणि रजनीचें हाडवैर असावयाचेंच. मग ती कितीही सुखकर असो, फलद्रुप असो, अथवा शांतिकर असो. त्याप्रमाणेंच रावणाची ती हाडवैरी झाली होती. श्रीरामाचे आणि रात्रीचे तरी या सीतावियोगा मुळें असेंच बनत नव्हतें राम, हा सिते! हा सिते! ह्मणून शोक करी आणि रावण, हे लावण्य लतिके, हे मृगनयने सीते ह्मणून ध्यास घेई. एकंदरींत दोघांची तळमळ एक, आशा एक व हेतूही एकच पण अधिकार मात्र निराळे. सितेच्या ध्यासामुळें रावणास चैन नाहीं, झोंप नाहीं विश्रांति नाहीं. सर्वरात्र विवंचना कायती सितेच्या लाभाची रोज कांहीं तरी नवी कल्पना योजावी आणि उजाडलें नाहीं तो राक्षस राक्षसिनींचे रटांबळ घेऊन अशोकवनांत यावें! ती फसली ह्मणजे परत जावें! पुन्हां दुसरें दिवशीं पाहिले पाढे पढोपंचावन आहेतच! मारुती या कल्पना तरंगांत गुंततो न गुंततो तों रावण अनेक स्त्रियांचा घोळका घेऊन जानकीकडे येत आहे असें अंजनी सुतानें पाहून विचार केला कीं, हा येऊन काय करतो तें पाहूं आणि नंतर आपण काय करावयाचें तें करूं. असें केल्यानें दोन तीन कार्यें होतील. एक रावणाचें स्त्री लंपटत्व कळेल आणि तें कळलें ह्मणजे त्याचें अवसान समजेल. दुसरें, जानकीचे पातिव्रत्य संबंधानें संशय अथवा कल्पना करण्याचें

अगत्य नाहीं. आणि तिसरें, रामचंद्रास परत निरोप सांगतांना समक्ष पाहिलेला प्रकार चांगला सांगतां येईल. मारुतीचे हे विचार चालले आहेत तों रावण येऊन पोंहाचला. रावणा शिवाय या घोळक्यांत शंकूकर्ण कायतो पुरूष होता. रावणास पहातांच जानकीनें त्याजकडे पाठ फिरविली. सितेनें वश व्हावें ह्मणून रावणानें आपल्या ऐश्वर्याचें वर्णन केलें पण व्यर्थ, पराक्रमाचें वर्णन केलें तरी व्यर्थ, अगाध ज्ञानाचें वर्णन केलें पण सर्व व्यर्थच झालें! शेवटीं विनवणी केली, प्रार्थना केली, जंग जंग पछाडले तरी तेही सर्व व्यर्थच गेले! जानकीनें, हें महापातक न करण्या बद्दल ही पुष्कळ बोध केला, समजुतीचे मार्गानें सांगितलें, निर्भर्त्सना करून सांगितलें पण त्यास विनाशकाळानें ग्रासिलें असल्यामुळें जानकीचे सर्व श्रम दगडावरील पाण्याचे रेघेप्रमाणें मोघदळा झाले! रावण ऐकेना आणि जानकी बधेना. अशा झटापटी बराचवेळ होऊन रावण निकरावर आला आणि त्यानें निर्वाणीचें सांगणें सांगितलें कीं, तु केलेली निर्भर्त्सना माझ्या अंतःकरणाचा इतका संताप करते कीं, त्याबरोबर तुझे तुकडे उडवावें असें वाटतें व ते करणें मला अशक्य नाहीं परंतु तुझें मोहक रूप आणि माझी प्रीति एक झाल्यामुळें माझे हात टढा ळिगनास मात्र धजावतात! आतां दोन महिन्यांचे आंत

तूं जर माझे मनोरथ पूर्ण करणार नाहींस तर तुला इह लोकचा बिछाना गुंडाळून जावें लागेल आणि तुझा देह माझे सकाळचे बाळवाटींत पचविला जाईल हें खूप ध्यानांत ठेव. हें भाषण ऐकतांच जानकी, नुकतीच कात टाकले ल्या नागिणी सारखी चवताळिली!! तिनेंही हा दशशीर, क्रूरतेनें आपला प्राण घेईल हें मनांत न आणतां त्यास अगदीं कुत्र्या निपट केला. तेंव्हांच रावणानें सितेवर शस्त्र उचललें; पण धान्य मालिनीनें रावणास आवरल्या मुळें तो दुर्धर प्रसंग राम रावण युद्धावर लोटला. रावण गेल्यावर जवळ असलेल्या राक्षसिनींहीं रावणाचे तर्फे पुष्कळ खटपट केली. तेंव्हां सितेनें एकच उत्तर दिलें तें हेंच कीं, माझे न-खाचाही स्पर्श रावणास होणार नाहीं मग देहाची आशा कशास करतां? यांचें हें बोलणें चाललें आहे तों त्रिजटा आ ली आणि तिनें सर्व राक्षसिनी दूर केल्या. इतका प्रकार झा ला तरी जानकीस स्वस्थ वाटेना. तिनें आपल्या केशांचा कंठपाश करून आत्महत्येची तयारी केली आणि आतां फा स घेणार तों वाम नेत्र आणि भुज स्फुरण पावले. मारुती हें सर्व पाहत होताच. त्यास वाटलें आतां विलंब लावणें घा-तक आहे. बरें, आहे या स्वरूपानेंच गेलों तर ही राक्षसी माया समजून जानकी विश्वास ठेवील किंवा नाहीं कोण जाणें! खरें स्वरूप प्रगट करावें तर या राक्षसिनी आतांच

रावणा कडे भाऊन लढाईचा प्रसंग आणणार! इतकी उपा धी उपस्थित करण्या पूर्वी आहे या रूपानेंच हिला क ळवून पहावें इतक्यानेंच भागले तर पुढील प्रकार करा वा हें बरें. असें मनांत आणून त्यानें तेथूनच बोलण्यास सुर वात केली प्रथम त्यानें दशरथ आणि राम यांचें नातें सांगित ले नंतर राम आणि जानकीचें नातें, वनांत येण्याचें कारण, वनांत आल्यावर केलेलीं कृत्यें, स्त्री हरण, जटायूची भेट, पंपासरोवरावर येणें, वालीवध, सुग्रिवाशीं सख्य, उपकार फेडण्यास्तव सुग्रिवाचा प्रयत्न इत्यादि पूर्व इतिहास सांगून त्याचा दूत मारुती, ज्यास हनुमानही म्हणतात, तो मी तुजसाठीं लंका शोधीत आलों आणि रामाज्ञे प्रमा णें शोध लागला, हें आनंद जनक कृत्य त्यास कळविणे आहे तें लौकरच कळेल. इतकें बोलून स्तब्ध बसला. रा मचरित्र ऐकतांच सीता चकित झाली. वृक्षावर पाहते त र कोणी दिसेना, तेव्हां तिनें प्रार्थना करतांच मारुतीनें मूळ स्वरूप धारण करून वंदन केलें व पुढें उभा राहि ला. त्यास पाहतांच जानकीनें प्राण देण्या करतां जी तया री केली होती ती सोडून खालीं बसली. तरी हा राव णा सारखा वेषधारी वानर नसेल कशावरून? असें तिला वाटलेच. तिची अशी साशंक मुद्रा पाहतांच मारुती समज ला आणि म्हणाला खरोखरच मी रामदूत आहे राक्षसी

माया नव्हे, याची साक्ष ही राममुद्रिका देईल. असें बोलू न मारुतीनें ती पुढें ठेविली. मुद्रिका पाहतांच सीतेस ओळख पटून अत्यंत आनंद झाला. प्रेमाश्रूंनीं डोळे भरून आले! आनंद आणि दुःखाची छाया तिचे चेहऱ्यावर दिसे लागली!! सीतेनें वरचेवर त्या मुद्रिकेकडे पहावें, तिचें चुंबन घ्यावें, आणि ती आणणाऱ्या मारुतीकडे पाहून प्रेमातिशय दाखवावा! अशांत कांहीं वेळ गेला. तेव्हां मारुती ह्मणाला मातुश्री, श्रीरामचंद्र आणि आपण एकरूपच आहांत तरी देहभिन्नत्वामुळें लौकिक व्यवहार केला पाहिजे. या करतां आपण श्रीराम भेटीस चलावें आणि मला कृतार्थ करावें. मारुतीचें हें साविनयपूरीत भाषण ऐकून सीतेस प्रेमाचें भरतें आलें. तरी ती विचार करून ह्मणाली; बा मारुते, तुझे ह्मणण्या प्रमाणें मी आले असते, परंतु अशा माझ्या येण्यानें रामजन्माचें सार्थक होणार नाहीं, हा पर स्त्री लंपट मरणार नाहीं, रामाची कीर्ति होणार नाहीं; आणि वाल्मिकाचे कथन व्यर्थ जाईल. या साठीं माझी खुणगोष्ट रामास सांग आणि माझे डोकींतील हें फूल खुणेसाठीं त्यास दे. आणखी असेंही सांग कीं, एक महिन्याचे आंतच येऊन मला घेऊन जावें. तों पर्यंत रामध्यानांत ह्या देहाचें कसें तरी संरक्षण करीन. असें सांगून सीतेनें मारुतीस निरोप दिला.

मारुती सितेचा निरोप घेऊन निघाला परंतु रावणास भे टल्या शिवाय जाणें हें हेरा सारखें होईल तेव्हां कांहीं तरी युक्ति काढून त्यास भेटावें हें बरें. असें मनांत आ णून त्यानें अशोक वनाच्या कांहीं भागाचा विध्वंस के ला, सहस्त्र स्तंभी राजमंदिराचा नाश केला, व कांहीं रक्षक मारले. अशा अनर्थामुळें राक्षसी घाबरल्या आणि आरडत ओरडत रावणाकडे गेल्या. रावणानें मारुतीस मारण्या क रता किंकरास पाठविलें परंतु मारुतीनें पहिल्या झपाट्या स त्याची चांदी आटविली. तो मरतांच विरुपाक्ष, युपाक्ष वगैरे पांच सेनापती ससैन्य मारुतीवर पाठविले. तितक्यां चाही मारुतीनें निःपात केला! यामुळें रावण फारच च वताळून गेला आणि त्यानें आपला पुत्र अक्ष पाठवि ला. तोही यमपंथीं गेला! तेव्हां इंद्रजित आला आणि त्यानें महा आयासानें ब्रह्मास्त्र प्रयोग करून मारुतीस धरलें, आणि रावणापुढें उभा केला. मारुती पाशबद्ध आ हे, आणि रावण शोक क्रोधबद्ध आहे तेव्हां एखादा भ यंकर प्रकार घडेल म्हणून इंद्रजितानें सांगितलें कीं, या चें काय करावयाचें तें मंत्र्यांचे विचारें करावें हें मला ब रें दिसतें. कारण हा वानर सामान्यापैकीं नसोन अलौ किक पराक्रमी आहे. सबब अविचार होता कामानये. या प्रसंगीं मारुतीनें ही फार बोधपर आणि सुरस भाषण केलें. पण रा

बण मतिभ्रष्ट झाला असल्यामुळें "मूर्खा पुढें वाचली गी ता आणि रात्रीचा गोंधळ बराच होता" या म्हणी प्रमाणें याचे भाषणाचा कांहीं उपयोग झाला नाहीं. इतकेंच नाहीं पण यास जाळण्याचा रावणानें जो प्रयत्न केला त्याचें फल लंका दहन हेंच मिळालें!! लंकेचा कांहीं भाग दहन करून व सितेचा निरोप घेऊन मारुती अरिष्ट पर्वतावर गेला आणि तेथून उड्डाण करून आपल्या मंडळींत आला. मारुती आपल्या मंडळींत आला आणि तो मोठा पराक्रम व सीता शुद्धी करून आला यामुळें सर्वांस अत्यानंद झाला! सुग्रीव आणि रामलक्ष्मण तर धन्य मारुती!! धन्य अंजनी तनय, धन्य वायू आणि वायूसूत, असें वारंवार ह्मणत; तें सर्वथैव खरें आहे.

मारुतीचा पराक्रम ज्ञान आणि बुद्धि, या संबधानें इतकावेळ सांगितलेला इतिहास पुरे आहे, असें मला वाटतें. आतां रामाचे ठिकाणीं त्याचें प्रेम किती होतें हें सांगण्यास रामकथेंत अनेक साधनें आहेत. सेतु बंधन, राक्षस मर्दन, लक्ष्मण शक्तीचे वेळीं औषधी आणणें, इत्यादि अनेक गोष्टींनीं रामायण भरलें आहे; परंतु तितक्या सांगत बसण्या इतका अवकाश नाहीं. सबब अहिमही वधाचे संबंधाची एक साधी गोष्ट सांगून मी आपलें भाषण पुरें करतों.

रावणाचे बंधू, पुत्र वगैरे सर्व समरांगणीं पडले. आ तां पाठीराखा कोणी राहिला नाहीं. व आपणावरही मरणाची पाळी येणार अशी खात्री पटल्यामुळें रावणानें शोकास आरंभ केला. तेव्हां विद्युज्जिव्ह प्रधानानें त्यास शोक नकरितां अहिमहींची प्रार्थना कराल तर ते कपट विद्येनें रामलक्ष्मणास नेऊन कालिकेस बळी देतील, आ णि आपणास संकट मुक्त करतील असी सल्ला दिली. रावणास ती सल्ला बरी वाटून त्यानें अहिमहीस बो लावलें आणि ही कामगिरी सांगितली. हें वर्तमान बि भीषणास समजल्या वरून त्यानें रामास सावध केलें. रामानें बंदोबस्त केला होता तथापि तो बाह्य होता. अहिमहीनीं आंत विवर करून व रामलक्ष्मणावर मोह घा लून त्यांस मंचकासह जें अचानक उचललें तें महिका वतींत आणलें. ही अहिमहींची राजधानी असल्यामुळें बं दोबस्त होताच तो चांगला मजबूत केला. इकडे सुवेळाचलावर सूर्योदय होतांच मंडळी रामाकडे आली. आणि पाहतात तों तेथें काय आहे? राम नाहीं आणि ल क्ष्मणही नाहीं! तेव्हां सर्व चकित झाले! बोभाटा करावा तर आपले सैन्यांत घोटाळा होऊन रावणास आयतीच सं धी सापडेल. न बोलावें तर रामलक्ष्मणाविरहित रहून तरी उपयोग काय? अशा घोटाळ्यांत मंडळी पडली.

तेव्हां बिभीषणानें सांगितलें अशा घोटाळ्यांत पडून व्यर्थ शीण करूनका. मारुती तुमच्या हातांत आहे. त्यास रामाशिवाय चैन पडावयाचें नाहीं; आणि रामाचा शोध त्या शिवाय लागावयाचा नाहीं. या करितां त्याला महिकावतीस पाठवून शोध लावावा हें मला बरें वाटतें. ही कल्पना सर्वांस बरी वाटून त्यांनीं मारुतीची प्रार्थना केली. रामकार्य ह्मणजे मारुतीचा तिसरापाय. त्यानें लागलीच रुकार देऊन राक्षसांच्या पावलाच्या खुणे वरून मार्ग काढला, आणि नळ, नीळ, अंगद व जांबवंत यांस बरोबर घेऊन विवरांत उतरला. विवर फार मोठें आणि निर्वात असल्यामुळें सर्वांचे प्राण कासावीस झाले. तथापि तसेंच साहस करून ते सर्व विवराद्वारापाशीं आले. तेथें शीतळ वारा लागल्यामुळें हे चैाघेही चांगले तयार झाले. त्या दारावर पहारा असल्यामुळें आंत प्रवेश होईना. तेव्हां यांनीं यात्रेकऱ्यांचीं रूपें घेऊन जाण्याचा उद्योग केला. तरी ते दाररक्षक जाऊं देईनात, तेव्हां त्यांच्याशीं संग्राम करून एका मकरध्वजाशिवाय सर्वांचे प्राण हरण केले. मकरध्वज मारुतीचा पुत्र आहे. असें मारुतींचें आणि मकरध्वजाचें युद्ध होत असतां अनायासें समजलें. इतक्यांत मकरध्वजाची आई मगरी येऊन तिनें ब्रह्मचाऱ्याचे थुंकीपासून पुत्र कसा आणि केव्हां झाला हें सांगितलें.

इतकेंच नाहीं पण रामलक्ष्मणास बळी देण्याची तयारी चालली आहे. तर तुह्मी विलंब न लावतां अगोदरच कालिकेच्या देवळांत जाऊन बसा म्हणून मारुतीस सांगितलें. तेव्हां मारुती, कालिकेच्या देवळांत जाऊन देवळाचें दार बंद केलें व देवीस पाळथी घालून आपण देवी झाला.

ज्यांना ठग लोकांचा वृतांत आणि कृती माहित आहे त्यांस हें वर्णन ऐकून अतिशयोक्ति वाटणार नाहीं. ज्या कालिकेस राम लक्ष्मण बळी देण्याचें योजिलें होतें ती देवी ठग लोकांचे देवी प्रमाणें असल्यामुळें आणि तिचे भक्त राक्षसी ठगच असल्यामुळें त्या सर्व देवालयांत प्रेतें, मांस, अस्ति आणि शोणित या शिवाय दुसरें काय असणार? राम लक्ष्मणासारखे पराक्रमी मानव, त्यांतून रावणाचे शत्रू, नुसते शत्रू नव्हत तर कुंभकर्ण, इंद्रजित इत्यादिकासारख्या महापराक्रमी, शूर आणि अप्तांचा संहार करणारे सापडल्या वर त्या अहिमहींचे आनंदास काय विचारावें? अहिमहींनीं राम लक्ष्मणास फारच मोठा समारंभकरून मोठ्या थाटानें वाद्यांच्या गजरानें, सावकाश, मिरवित मिरवित कालिकेच्या देवालया पाशीं आणलें. तों देवीचें द्वार बंद! हें पाहतांच मंडळी घाबरली! आणि तिची स्तुती करूं लागली. तेव्हां या देवीरूप मारुतीनें आंतूनच सांगितलें कीं, तु

ह्मी रामलक्ष्मणास बली देण्यास आणलेत हें चांगलें के लें. मी लंकेंतील सर्व बली खाल्ले पण तुमचे बलीशिवाय माझी तृप्ति होत नाहीं. मी उग्ररूप धारण केलें आहे. तें तुमच्यानें सहन होणार नाहीं. या करतां वरील गवा क्षांतून रामलक्ष्मणास सोडून द्या. आणि काय पूजा करणें ती तेथूनच अर्पण करा. त्या प्रमाणें अहिमहींनीं केलें; आणि कधींही न बोलणारी देवी बोलली या आनंदांत सर्व नाचूं लागले. जे या समारंभाचे वेळीं समंजस व विचारी लोक तेथें होते; ते हें कांहीं तरी अघटित कृत्य आहे, रावणाचे लंकेप्रमाणें येथेंही प्रसंग गुजरणार म्हणून हळूहळू पाय काढून घेऊन निघोन गेले. या राक्षसांनीं रामलक्ष्मणा वरील मोहनी काढून त्यांस बळी देण्यास काढलें, तेव्हां पुष्कळांस वाईट वाटलें. स्त्रिया तर त्यांचें मनोहर रूप, अनुपम सौंदर्य, नीट नेटका बांधा आणि कोमल तनू पाहून लुटपुटल्या. आणि क्रूर कर्माबद्दल संतापून श्राप देऊन अश्रूही ढाळूं लागल्या!! महि रावणाची स्त्री चंद्र सेना ही या स्त्री समूहांत होतीच. ती तर अति मोहित होऊन राम पती मिळेल आणि हा तारुण्य बहर लुटण्यास सांपडेल, तर बरें, असें चिंतन करीत आणि मोहशोकांनीं व्याप्त होऊन उभी राहिली, असो, अहिमहींनीं रामलक्ष्मणास गवाक्ष दा

रांतून लोटून दिलें आणि कृतकृत्यता मानली. रामलक्ष्मण देवालयांत पडले आणि पहातात तों देवीचें रूप फारच विक्राळ असोन तिनें विशाळ वदन पसरलें आहे, लळलळीत जिव्हा ग्रास घेण्या करता पुढें पुढें करीत आहे; नेत्रांतून आग्निज्वाळा निघून त्या ब्रम्हांड धग्ध करतात कीं, काय असें वाटे. अगोदरच मारुती जात्याच उग्र, त्यांत वीरश्रीनें फुगलेला! त्यांत रामलक्ष्मणास भिवविण्या चा उद्योग. मग त्या स्वरूपाचें भयंकरपण काय सां गावें? असो. मारुतीरूप देवी भयंकर हाक फोडून रामलक्ष्मणास म्हणते, हे राजपुत्रहो! मी आतां तुमचें भक्षण करणार! जर तुमचा कोणी त्राता असेल तर त्वरित स्मरण करा! देवीचें हें भाषण ऐकतांच राम म्हणाले. मी कोणाला आठवूं? या वेळीं माझे प्राणाचा प्राणसखा मारुती असता तर हें संकट आलें नसतें!! तर हे जगज्जननी आदिमाये, माता जशी बाळाचें संरक्षण क रतें तसें आतां तूंच आमचें संरक्षण कर! रामाचे तोंडचे हे शब्द ऐकतांच मारुती सद्गदीत होऊन त्यानें रामा चे गळ्यास मिठी घातली!! रामानें मारुतीस पहातांच सद् गदीत अंतःकरणानें कडकडून मिठी मारली आणि म्हणा ला. हे प्राणसख्या मारुते, मी अनंत अवतार घेतले पण तुजसारखा पाठिराखा, कैवारी, आणि भक्त मला मिळा

ला नाहीं. आणि पुढें मिळणारही नाहीं! तुझे उपकारा ला अंत नाहीं; व हे कल्पांतींही फिटणार नाहींत!! हा भक्ति आणि प्रेमपूर उचंबळत आहे, तों लक्ष्मणानेंही येऊन मारुतीचे कमरेस मिठी मारली!!

श्रोतेहो, या पेक्षां जास्त तें भक्तीचें लक्षण कोणतें? प्रेम तें काय? आणि असणार तें काय? असो, मारुतीनें इकडे ही भक्तिरसाची सीमा केली. तिकडे महिरावण शिव भक्त असोन वरदी असल्यामुळें त्यास मारणें अशक्य झालें. तेव्हां त्याच्या स्त्रियेस वश करून आणि राम पती करून देतो असें वचन देऊन महिरावणाचें मरण शोधलें आणि रामाकडून त्याचा वध करवून सुखीं केलें. राम एक वचनी, एकपत्नी आणि एक बाणी आहे. तो पर स्त्रियेचा अंगिकार करणार नाहीं हें मारुतीस माहीत होतें. असें असतांही कार्य साधनार्थ हा लटका खटाटोप केला, तो पुरा करण्याकरितां रामास, चंद्रसेनेच्या महालांत नेलें. मी रामाचें आणि तुझें सख्य करतों परंतु चंद्रसेनेला सांगितलें रामास तुझे महालीं विघ्न झाल्यास तो बसणार नाहीं! आणि चंद्रसेनेचें रामास बसण्याकरितां तयार केलेला पलंग भुंगा लावून इतका पोखरविला कीं, रामाचा पाय लागतांच तो मोडून जावा!त्या प्रमाणेंच सर्व घडलें. मारुतीनें अशा युक्तीनें महीचा वध करवला. कृष्ण अवतारीं तुला स्त्री करीन ह्मणून रामाकडून वचन देववून त्याचे

एकपत्नी व्रत कायम राखलें. चंद्राननेचें कार्य केलें, आणि आपण दिले वचनांतून मुक्त झाला!! अशा महा पराक्रमी, महा कल्पक, धैर्यवान आणि ईश्वरभक्त मारुतीस श्रीरामचंद्रानें चिरंजीवित्व दिलें आणि तें लोककल्याणार्थ दिलें यांत आश्चर्य तें काय?

महाराज, वरील चरित्रा पासून काय घेण्या सारखें आहे? या प्रश्नाचें, उत्तर मारुतीची माता आणि पिता भगवत् भक्त आणि पराक्रमी होती ह्मणून मारुती पराक्रमी व भगवत् भक्त झाला. रामाचे आणि सुग्रिवाचें सख्य करण्यांत शोधकत्व, प्रीति तत्परतां आणि राजकारस्थान व्यक्त केलें. सिता शुद्धीचे कामांत दृढ निश्चय, धैर्य, साहसबुद्धि आणि पराक्रम स्पष्ट करून दाखविला. आणि अहिमही वधाचे कामांत कल्पकता, स्वामि भक्ति आणि प्रसंगावधान हीं उघड झालीं हेंच होय. अशाची भक्ति कां करू नये? अलबत करावी. मी ह्मणतों त्याची पूजा करणें, भक्ति करणें, त्याचे चारित्राचें कथन करणें, त्याच्या कृत्यांचें मनन करणें, एकाग्र चित्तानें त्याचें आणि त्यानें ज्याचें ध्यान केलें, त्याचें ध्यान करणें, हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. आणि म्हणूनच त्याची पूजा करावयाची; भक्ति करावयाची, त्याचे आंगचे चांगले गुण संपादावयाचे आणि त्या सारखे ब्रह्मचारी रहावयाचे. श्री समर्थ रामदासांनीं याची स्थापना जागोजाग केली.

त्यांत त्यांचा उद्देश तरी हाच होता. जे, हे गुण संपादन करीत नाहींत, अथवा करणार नाहींत; त्यांनीं केलेली पूजा खरी पूजा नाहीं; त्यांनीं दाखविलेली भक्ति खरी नाहीं; दांभिकी आहे, अज्ञानाची आहे, लौकिकी आहे आणि अनुकरण वृत्तीची आहे. या पासून लाभ नाहीं, पुण्यनाहीं, श्रम मात्र आहेत. तर मारुती भक्तानों! आपण ध्यानपूर्वक, गुण गृहण करण्याच इच्छेनें त्याची भक्ति करा, ह्मणजे उभय लोकीं आपलें कल्याणच होईल. यास अनुसरून आपण वागाल अशी तो सर्वेश्वर पूर्ण मंगल आपणास बुद्धि देवो, अशी प्रार्थना करून मी आपलें बोलणें संपवितों.

# सूचना.

—*—

महाभारत, रामायण, इत्यादि ग्रंथां चें ज्ञान नसणारे अनेक पुरुष व स्त्रिया आपल्या समाजांत आहेत, त्यांना अत्यल्पका होईना पण कांहीं तरी लाभ व्हावा व त्यांनीं आपल्या पुराण पुरुषांचीं चरित्रें वाचूं लागून त्या पासून चांगल्या गोष्टींचें अनुकरण करावें ह्मणून हें लाहनसें चरित्र लिहिलें आहे.

या चरित्रांत लिहिण्या सारख्या आणखी बऱ्याच गोष्टी आहेत परंतु पुस्तक खरेदी घेऊन वाचणारे अथवा वाचून दाखविणारे गृहस्थ पाहिजे तितके अद्याप फारसे झाले नाहींत व जे आहेत ते अल्प किंमतीस पुस्तक मिळावे अशा इच्छचे आहेत ह्मणून कांहीं भागास अति संक्षेप रूप दिलें आहे. कांहींस कथेकऱ्यांचा हवाला दिला आहे व कांहीं अजिबात गाळणेंच बरें वाटलें! याची वाचक क्षमा करतीलच